FYBA Sem II

Paper / Subject Code: 96016 / Marathi (Compulsory)

FYBA Sem II
2.30 - 5.30
9/5/19
page - 3

9.5.19 (290)

**Q.P. Code : 02645**

[वेळ: तीन तास] [गुण:१००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना
1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र.१ अ) 'खराब अक्षर ही अर्धवट शिक्षणाची निशाणी समजली पाहिजे' या विधानाची सार्थकता म.गांधीजीच्या जीवनात कशाप्रकारे दिसून येते. 'दुस-यावेळी पास झालो' या लेखाद्वारे परामर्श घ्या. २०

**किंवा**

आ) 'नापास मुलांची गोष्ट' मधील 'संगमनेरचे दिवस' या दया पवार यांची लेखातून परिस्थितीशी केलेला संघर्ष आणि त्यातून घडत गेलेल्या व्यक्तिमत्वाची जडण- घडण कशाप्रकारे चित्रित केली आहे. साधार लिहा.

प्र.२ अ) सुशीलकुमार शिंदे आणि यशवंतराव गडाख याची परिस्थितीशी झुंज देत राजकीय व सामाजिक जडण-घडण कशाप्रकारे झाली ते 'नापास मुलांची गोष्ट' मधील लेखाच्या आधारे स्पष्ट करा. २०

**किंवा**

आ) चित्रपट व संगीत क्षेत्रातील वेगवेगळे अनुभव 'सरगम' या लेखातून सी.रामचंद्र यांनी कसे उलगडून दाखविले साधार लिहा.

प्र.३ पुढीलपैकी **कोणत्याही दोन** टिपा लिहा १०

अ) कुसुमाग्राजाचे माध्यमिक शाळेविषयीचे अनुभव

ब) शांता शेळके यांची शाळेतील आठवण

क) वाय.सी. पवार याची कौटूंबिक पार्श्वभूमी

ड) ना.सी.फडके याचे बालपण

प्र.४ अ) आयुर्वेदिक औषध निर्मिती प्रा, लि. नागपूर या कंपनीस मुंबई, नाशिक व पुणे येथे नवीन शाखा सुरु करायच्या आहेत त्याकरिता प्रारंभिक साधनाच्या पुर्तते कंपनीच्या संचालक मंडळाने दोन सदस्यांची समिति नियुक्त केली त्याच्या पाहणीचे 'अहवालात्मक' इतिवृत्त तयार करा. १०

**किंवा**

आ) 'म.फुले सार्वजनिक वाचनालय' याची वार्षिक सभेचे इतिवृत्त खालील मुद्याच्या आधारे तयार करा.
(मुद्दे: दिनांक, वेळ, अध्यक्षाची निवास, वार्षिक, ताळेबंद, ठराव, इतर विषय)

प्र.५ अ) ऐतिहासिक वस्तूची व दुर्मिळ पुस्तकाचे प्रदर्शन एका आठवड्यासाठी मुंबईत लागणार असल्याची जाहिरात तयार करा. १०

**किंवा**

आ) 'प्रबोधन' या नवीन दैनिकाचा लोकार्पण सोहळा १ मे २०१७ रोजी आयोजित केला असून मोठ्या संख्येने उपस्थित वाहण्याचे आवाहन करणारी वर्तमानपत्रासाठी जाहिरात तय़ार करा.

[पुढे पहा]



18

0B8E2C11B6565BD88FB909D4E3620F95

**प्र.६** पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहा. **१०**

एके दिवशी सकाळी नेहमीची स्वच्छतेची कामे आटोपून घरी असताना बाबांना एक थरथरणारे चिंध्याचे गाठोडे रस्त्याच्या कडेला दिसले. जवळ आल्यावर त्याच्या लक्षात आले कि ते गाठोडे म्हणजे एक कुष्ठरोगाने ग्रासलेला माणूस होता. त्याला नाकाच्या जागी फक्त दोन छिद्रे होती व हातपायाची बोटे नव्हती. त्याच्या असंख्य फोडांमध्ये अळ्या वळवळत होत्या.

घाबरून बाबा पूर्ण शक्तीनिशी तिथून दूर धावले. नंतर थोडे सावरून ते परत त्या ठिकाणी आले आणि त्यांनी त्या माणसाला एका रिकाम्या पोत्याने झाकले. तथापि तो संपूर्ण दिवस बाबांना टोचणी लागली होती. हे इतके का घाबरले? बाबांना त्यांच्या ढायीच्या निर्भयतेचा सदैव अभिमान होता. एकदा रेल्वेगाडीत बाबांनी एकट्याने काही ब्रिटीश शिपायांना एका तरुण भारतीय नववधूला छेडन्यापासून रोखले होते. या राजधर्माला शोभेशा साहसात त्यांना मार खावा लागला. या प्रसंगानंतर गांधीजींनी खरोखरच बाबाचे 'अभय साधक' असे नामाभिधान जाहीररीत्या केले होते.

स्वत:ची लाज बाबांनी या भीतीवर मात करण्याचा निश्चय केला आणि कुष्ठारोग्यांची काळजी घेण्यात स्वत:ला झोकून देणे हा यावरील मार्ग आहे अशी त्याची खात्री पटली.

**प्रश्न :-**

१) रस्त्याच्या कडेला बाबांना काय दिसले?

२) 'अभय साधक' असे नामाभिधान त्यांना कोणत्या प्रसंगामुळे मिळाले?

३) कोणत्या दृष्टीने बाबांना टोचणी लागली होती?

४) बाबांनी भीतीवर मात करण्यासाठी कोणता निश्चय केला?

५) उताऱ्याला समर्पक शीर्षक सुचवा.

**किंवा**

"एक वेळ अशी होती की संपूर्ण युरोपच्या आताच्या संपत्तीपेक्षा बहुधा जास्त भारताची संपत्ती होती. सर्व अमेरिकेकडे आता जेवढे हिरे, माणिक-मोती व पाचू आहेत त्यापेक्षा जास्त एकेकाळी भारताकडे होते. भारताने ऐहिक भरभराटीत पूर्वी नाव काढले. वेळोवेळी एकापाठोपाठ एक देशांनी भारतावर अतिक्रमण केले. भारताला लुटून ग्रीस श्रीमंत झाला; पर्शिया श्रीमंत झाला; अफगाणिस्तान श्रीमंत झाला आणि सांप्रत इंग्लंड भारताला लुटून संपत्ती गोळा करीत आहे. एकेवेळी भारत खरोखरच सोन्याची आणि हिऱ्याची भूमी होती."

"आम्हाला त्याचा पश्चात्ताप नाही. ऐहिक संपत्ती कमी झाल्याबद्दल आम्ही झुरत नाही. निसर्गनियमांची आम्हाला जाण आहे. अशी ऐहिक संपत्ती व ती मिळविण्याचे असे प्रकार या सर्वांचा प्रयोग पूर्वी भारतीयांनी केलेला आहे. त्याचा तुलनात्मक अभ्यास करता त्याच्यात भारतीयांना त्रुटी दिसलेल्या आहेत. अमेरिका अगदी अर्वाचीन देश आहे. तसा युरोपही अर्वाचीनच आहे. ते सध्या असे प्रयोग करताहेत. भारतीय या ऐहिक गोष्टींना केवळ तुषारातील एक थेंब मानतात. त्या तुमच्या समाधानाशी निगडित नाहीत. त्या तुम्हाला कधीही खरे समाधान देऊ शकत नाहीत. लोखंड व सोने हे लोखंड आणि सोने म्हणूनच विकत घेण्याजोगे असते, त्या पलीकडे नाही. समाधानाचे स्वरूप या ऐहिक गोष्टींपेक्षा वेगळे असते. ते विकत घेता येत नाही. निर्भेळ समाधान, आनंद हे या ऐहिक गोष्टींतून विकत घेता येत नाहीत."

**[पुढे पहा]**



0B8E2C11B6565BD88FB909D4E3620F95

**प्रश्न :**

१) भारतात एकेकाळी अमेरिकेपेक्षा काय काय जास्त होते?

२) भारत कशामुळे गरीब झाला?

३) कोणते प्रयोग पूर्वी भारतीयांनी केलेले आहेत?

४) ऐहिक गोष्टींपेक्षा भारतीय कशाला महत्त्व देतात?

५) भारतावर कोणकोणत्या देशांनी अतिक्रमण केले?

प्र.७ पुढील उताऱ्याचे सारांश लेखन करा. १०

आपण सर्व जण चुका करतो आणि त्या केल्या नसत्या तर आपण कधीच काही शिकलो नसतो. आपल्या शहाणपणात, चातुर्यात काहीच वाढ झाली नसती. चुकांनी दु:ख होऊ शकते. पण जर आपण स्वत:च्या चुकीतून काही शिकलो नाही तर चुकांमुळे सहन केलेल्या वेदना वाया गेल्या असे होईल. जोपर्यंत केलेल्या चुकीचे परिणाम इतके दु:खद होत नाहीत की शेवटी आपण त्यातून शिकून शहाणे होऊ तोपर्यंत आपण तीच चूक पुन:पुन्हा करीत राहू. आपण चुकांमधून शिकावे आणि पुन्हा त्याच त्या चुका करू नयेत म्हणून खरेतर चुका दु:ख, वेदना देता असतात.

एखाद्या चुकीतून शिकण्यासाठी प्रथम आपण स्वत: तिची जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि यालाच पुष्कळ लोक तयार नसतात. कारण ते त्यांच्या चुकांचा दोष दुसऱ्या कोणाला तरी देतात.

वेगात वाहन चालविले म्हणून पोलिसांनी गाडी पकडली आणि दंड केला ह्या घटनेचा विचार करू या. वेगात वाहन चालविण्याची जबाबदारी घेण्याऐवाजी, पोलीस हमरस्त्याच्या वळणावर झुडपात लपले, त्यांना आपण पाहू शकलो नाही; त्यांच्याकडे गतिवेधक बंदुक होती आणि आपल्याला सुटून जाण्याची संधी नव्हती म्हणून पोलिसांना आपण दोष देतो. पण चूक खरे तर आपलीच होती कारण वेगात वाहन चालविण्याचे आपणच ठरविलेले होते.

**किंवा**

पूर्वी कोकणात पुण्यामुंबईसारखे नळ नव्हते. त्यामुळे विहीर वापरावी लागे. चुकून एखादा विहिरीत पडण्याची शक्यता असे. म्हणून कोकणातील लोक पोहता येणे आवश्यक मानत. पावसाळ्यात विहिरी तुडुंब भरलेल्या असत. रहाटाशिवाय नुसत्या हातांनी पाणी काढता येत असे. अशा वेळी नवशिक्या मुलांना पोहायला शिकवले जाई. ही नवशिकी मुले पाण्यात बुडू नयेत म्हणून त्यांच्या कमरेला सुखड किंवा पिढले बांधत आणि खुशाल पाण्यात ढकलून देत. पट्टीचे पोहणारे ह्या मुलांना पोहणे शिकायला मदत करीत. पाण्याची भीती गेली की मुले तासन् तास पाण्यत पोहत. पोहून आल्यावर मुलांना खूप भूक लागे. जेवण झाले की त्यांना झोपावेसे वाटे. पण मोठी माणसे म्हणत, पोहून आल्यावर निजले की सर्दी होते.

प्र.८ पुढीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर निबंध लिहा. १०

१) ग्रंथचळवळ रुजवायला हवी

२) राजकारण आणि युवा पिढी

३) सोशल मिडिया : फायदे - तोटे

४) स्त्री स्वातंत्र्याचा खरा अर्थ

---